महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

विषय– फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत

* प्र क ट न *

फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

अ.क्र.	तपशील	लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी
१)	उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा (सर्वसाधारण, द्विलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा)	मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते मंगळवार, दि. १८ मार्च २०२५
	प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा	शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ ते सोमवार, १० फेब्रुवारी २०२५
२)	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा	शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२५ ते सोमवार दि. १७ मार्च, २०२५
	प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा	सोमवार, ०३ फेब्रुवारी २०२५ ते गुरूवार, २० फेब्रुवारी २०२५

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि.२७/११/२०२४ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७.११.२०२४

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/ २९९६
वाशी, नवी मुंबई४००७०३
दिनांक २५/११/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महावि
मुंबई /बृहन्मुंबई /ठाणे /पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव (प्र.)
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३

प्रतिः–
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा.

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः–

१) मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई.
२) शिक्षणाधिकारी(माध्य), ठाणे/रायगड/पालघर जिल्हा
३) शिक्षण निरीक्षक, पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग, मुंबई.
४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.

यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.

Created with cam scanner